# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दू. क्र. : ०२२ ६६४०५०६६, ६६४०६०६७, ६६४०५०७७ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


म्हाडा MHADA

===

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/१२८६ दि. १९/०५ /२०२१

<u>प्रसिद्धी पत्रक</u>

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे उपकरप्राप्त इमारतींचे नियमित पावसाळा पूर्व सर्वेक्षण- श्री. विनोद घोसाळकर

**<u>रहिवाशांची जीवित तथा वित्तहानी टाळण्यासाठी मंडळातर्फे आपत्ती निवारण यंत्रणा अधिक सक्षम</u>**

मुंबई, दि. १९ मे, २०२१ :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारीतील मुंबई शहर बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या नियमित व पावसाळा पूर्व सर्वेक्षण सुरू असून मंडळातर्फे भाडेकरू/रहिवाशांची जीवित तथा वित्तहानी टाळण्यासाठी आपत्ती निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्यात आली आहे, अशी माहिती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सभापती श्री. विनोद घोसाळकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

श्री. घोसाळकर म्हणाले की, १४ हजार ७५५ पैकी ०९ हजार ४८ उपकरप्राप्त इमारतींचे (६८ टक्के) नियमित व पावसाळापूर्व सर्वेक्षण झाले असून आतापर्यंत एकही अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारत निदर्शनास आलेली नाही.

श्री. घोसाळकर म्हणाले, की मंडळाच्या चारही झोनमध्ये ठेकेदार नियुक्त करण्यात आला असून इमारतीच्या धोक्याची लक्षणे तथा इमारत कोसळल्याचे मंडळाच्या निदर्शनास आल्यास संबंधित ठेकेदारामार्फत तात्काळ आपत्ती निवारणाबाबत कार्यवाही केली जाणार आहे. तसेच नियंत्रण कक्षातील अधिकारी तात्काळ जागेवर जाऊन इमारतीची पाहणी करून आवश्यक ती अनुषंगिक कार्यवाही करणार असल्याचे श्री. घोसाळकर यांनी सांगितले.

मंडळातर्फे दरवर्षी फेब्रुवारी/मार्च ते मे या कालावधीत उपकरप्राप्त इमारतींची पावसाळा पूरव सर्वेक्षण करण्यात येते. यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वेक्षणात अनेक अडचणी येत आहेत. याच पार्श्वभूमीवर उपकरप्राप्त इमारतींत राहणाऱ्या भाडेकरू/रहिवासी, म्हाडा पॅनलवरील वास्तुशास्त्रज्ञ व म्हाडाने नेमलेल्या कंत्राटदारांना आवाहन करण्यात येत आहे की, उपकरप्राप्त इमारतीत काही धोकादायक स्थिती निर्माण झाल्यास किंवा संशय आल्यास म्हाडाच्या २४ तास कार्यरत असणाऱ्या नियंत्रण कक्षाशी ०२२ २३५३६९४५, ०२२ २३५१७४२३ या दूरध्वनी क्रमांकांवर तसेच संबंधित कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन श्री. घोसाळकर यांनी केले.

मंडळातर्फे लवकरच उर्वरित उपकरप्राप्त इमारतींचे सर्वेक्षण युद्धपातळीवर पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. एखादी इमारत धोकादायक स्थितीत आढळून आल्यानंतर सदर इमारत रिकामी करावयाची वेळ आल्यास या इमारतीतील भाडेकरू /रहिवाशांच्या तात्पुरत्या, तात्काळ निवास

व्यवस्थेसाठी महावीर नगर कांदिवली येथील १३५ संक्रमण गाळे व पुनर्रचित इमारतीतील गाळे राखीव ठेवणे बाबतच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्याचे श्री. घोसाळकर यांनी सांगितले.

सद्यस्थिती लक्षात घेता उपकरप्राप्त इमारतींतील भाडेकरू/ रहिवाश्यांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी मंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, जेणेकरून अपघात होऊन होणारी जीवित व वित्तहानी टाळता येईल.

------- *********-------